राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे
रासनिप्रा
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ मेल आयडी - sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ अंदाजित निवडणूक निधी /निर्धारीत करणे/७९४८ /२०२३ दिनांक:२६/१०/२०२३

निवडणूक प्राधान्य

**वाचले** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुद.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३) मधील तरतुद.
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (सहा).
४. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ५२७८/सन २०२१, दिनांक ३१.१२.२०२१.
५. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ३२३९/सन २०२०, दिनांक १.१२.२०२०
६. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १६१८/सन २०२२, दिनांक २३.०२.२०२२.
७. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १७५५/२०२२, दिनांक २८.०२.२०२२.

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या गृहनिर्माण संस्था वगळून) निवडणूक प्रक्रियांचे अधिक्षण, पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (सहा) मधील तरतुदीनुसार अधिनियमाचे कलम ७३ कब (१३) नुसार सहकारी संस्थांनी निवडणूक निधीत आगाऊ जमा करण्याची आवश्यक असलेली निवडणूक खर्चा संबंधीत अंदाजीत रक्कम निर्धारीत करणे संदर्भात सर्वसाधारण अथवा विशेष आदेश पारीत करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ५ व ६ च्या आदेशानुसार मतदार संख्या विचारात घेऊन जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावरील अंदाजीत निवडणूक निधी व प्राधिकरण स्तरावरील निवडणूक निधी निर्धारित केलेला आहे. मात्र सदर आदेशात अंदाजीत निवडणूक निधीची गणना संबंधित संस्थेच्या गटातील टप्प्यानुसार वाढत्या क्रमाने (Progressive) दर्शविण्यात आलेली नसल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेली आहे. तसेच कमी मतदार संख्या असलेल्या काही संस्थांचा समावेश जास्त मतदार संख्या असलेल्या संस्थांच्या गटात झालेला असल्याची बाब देखील प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेली आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरण स्तरावरील निधी कमी सभासद संख्या असणाऱ्या संस्थांकरीता जास्तीच्या प्रमाणात आकारला असल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे प्राधिकरणाकडील वाचले क्रमांक ५ व ६ च्या आदेशात अधिक स्पष्टता आणण्याकरीता सुधारणा करणे आवश्यक झालेले आहे. आणि,

त्या अर्थी प्राधिकरण वाचावे क्रमांक ५ व ६ चे आदेश अधिक्रमित करुन सहकारी संस्थांचे प्रकार, संस्था कार्यक्षेत्र व त्यांची मतदार संख्या विचारात घेऊन निवडणूकीकरीता अंदाजीत रक्कम निर्धारित करणे संदर्भात खालीलप्रमाणे सुधारीत आदेश पारित करीत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कमल ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (सहा) मधील तरतुदीन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण संस्थानिहाय खालीलप्रमाणे अंदाजीत रक्कम निर्धारित करीत आहे.

**अनुसूची**

**अ. जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावरील अंदाजीत निवडणूक निधी :-**

| अ.क्र. | संस्था प्रकार | संस्थेचे नाव | मतदार संख्या | प्रति मतदारानुसार भरावयाचा किमान निवडणूक निधी | अंदाजीत कमाल निवडणूक निधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **अ वर्ग संस्था** | | | |
| १ | अ १<br>अ ३<br>अ ६<br>अ १० | राज्यस्तरीय शिखर संस्था/ भूविकास बँक/ कापूस पणन महासंघ/दुध संघ | १ ते ५० | २३०९ | ११५४५० |
| | | | ५१ ते १०० | १२१९ | १७६४०० |
| | | | १०१ ते २०० | ६७४ | २४३८०० |
| | | | २०१ ते ३०० | ४९२ | २९३००० |
| | | | ३०१ ते ४०० | ४०१ | ३३३१०० |
| | | | ४०१ ते ५०० व त्यापुढे | ३४७ | ३६७८०० |
| २ | अ २<br>अ ४<br>अ ५ | राज्य सहकारी बँक/हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन/आदिवासी विकास महामंडळ | १ ते २०० | ६७४ | १३४८०० |
| | | | २०१ ते ५०० | ३४७ | २३८९०० |
| | | | ५०१ ते १००० | २३८ | ३५७९०० |
| | | | १००१ ते १५०० | २०१ | ४५८४०० |
| | | | १५०१ ते २००० | १८३ | ५४९९०० |
| | | | २००१ ते २५०० | १७२ | ६३५९०० |
| | | | २५०१ ते ३००० | १६५ | ७१८४०० |
| | | | ३००१ ते ३५०० व त्यापुढे | १६० | ७९८४०० |
| ३ | अ ७ | सहकारी साखर कारखाना | १ ते ५०० | ३१३ | १५६५०० |
| | | | ५०१ ते २५०० | १५७ | ४७०५०० |
| | | | २५०१ ते ५००० | १३८ | ८१५५०० |
| | | | ५००१ ते १०००० | १२८ | १४५५५०० |
| | | | १०००१ ते २०००० | १२३ | २६८५५०० |
| | | | २०००१ ते ५०००० | १२१ | ६३१५५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व त्यापुढे | | |
| ४ | अ ८<br>अ ९ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक / सहकारी सूतगिरणी | १ ते २०० | ६०५ | १२१००० |
| | | | २०१ ते ५०० | ३१३ | २१४९०० |
| | | | ५०१ ते १००० | २१५ | ३२२४०० |
| | | | १००१ ते २००० | १६७ | ४८९४०० |
| | | | २००१ ते ३००० | १५१ | ६४०४०० |
| | | | ३००१ ते ४००० | १४२ | ७८२४०० |
| | | | ४००१ ते ५००० | १३८ | ९२०४०० |
| | | | ५००१ ते ६००० व त्यापुढे | १३४ | १०५४४०० |
| | | **ब वर्ग संस्था** | | | |
| १ | ब १ | नागरी सहकारी बँक | १ ते २०० | ४२० | ८४००० |
| | | | २०१ ते ५०० | २३६ | १५४८०० |
| | | | ५०१ ते १००० | १७५ | २४२३०० |
| | | | १००१ ते ३००० | १३४ | ५१०३०० |
| | | | ३००१ ते ५००० | १२६ | ७६२३०० |
| | | | ५००१ ते ७००० | १२२ | १००६३०० |
| | | | ७००१ ते १०००० | १२० | १३६६३०० |
| | | | १०००१ ते १५००० | ११८ | १९५६३०० |
| | | | १५००१ ते २०००० व त्यापुढे | ११७ | २५४१३०० |
| २ | ब २ | पगारदारांच्या सहकारी बँक | १ ते २०० | ४२० | ८४००० |
| | | | २०१ ते ३०० | ३१८ | ११५८०० |
| | | | ३०१ ते ४०० | २६७ | १४२५०० |
| | | | ४०१ ते ५०० | २३६ | १६६१०० |
| | | | ५०१ ते ६०० | २१६ | १८७७०० |
| | | | ६०१ ते ७०० | २०१ | २०७८०० |
| | | | ७०१ ते ८०० | १९० | २२६८०० |
| | | | ८०१ ते ९०० | १८२ | २४५००० |
| | | | ९०१ ते १००० व त्यापुढे | १७५ | २६२५०० |
| ३ | ब ३ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था | १ ते ५० | २०३ | १०१५० |
| | | | ५१ ते १०० | १४० | १७१५० |
| | | | १०१ ते ३०० | ९९ | ३६९५० |
| | | | ३०१ ते ५०० | ९० | ५४९५० |
| | | | ५०१ ते १००० | ८४ | ९६९५० |
| | | | १००१ ते २००० | ८१ | १७७९५० |
| | | | २००१ ते ३००० व त्यापुढे | ८० | २५७९५० |
| ४ | ब ४ | नागरी पतसंस्था (एका जिल्हयापेक्षा जास्त) | १ ते १०० | ६४८ | ६४८०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | १०१ ते २५० | ३२७ | ११३८५० |
| | | | २५१ ते ५०० | २२० | १६८८५० |
| | | | ५०१ ते १००० | १६६ | २५१८५० |
| | | | १००१ ते ५००० | १२३ | ७४३८५० |
| | | | ५००१ ते १०००० | ११८ | १३३३८५० |
| | | | १०००१ ते १५००० | ११६ | १९१३८५० |
| | | | १५००१ ते २५००० व त्यापुढे | ११५ | ३०६३८५० |
| ५ | ब ५ | पगारदार पतसंस्था (१ कोटी पेक्षा जास्त भागभांडवल) | १ ते ५० | ११८४ | ५९२०० |
| | | | ५१ ते १०० | ६४८ | ९१६०० |
| | | | १०१ ते २०० | ३८० | १२९६०० |
| | | | २०१ ते ३०० | २९१ | १५८७०० |
| | | | ३०१ ते ४०० | २४६ | १८३३०० |
| | | | ४०१ ते ५०० | २२० | २०५३०० |
| | | | ५०१ ते १००० व त्यापुढे | २०२ | ३०६३०० |
| ६ | ब ८<br>ब ९ | जिल्हा / तालुका खरेदी विक्री संघ / मध्यवर्ती ग्राहक संस्था | १ ते १०० | ३७१ | ३७१०० |
| | | | १०१ ते २५० | २०३ | ६७५५० |
| | | | २५१ ते ५०० | १४८ | १०४५५० |
| | | | ५०१ ते १००० | १२० | १६४५५० |
| | | | १००१ ते २००० | १०६ | २७०५५० |
| | | | २००१ ते ३००० | १०१ | ३७१५५० |
| | | | ३००१ ते ४००० | ९९ | ४७०५५० |
| | | | ४००१ ते ५००० | ९८ | ५६८५५० |
| | | | ५००१ ते ६००० व त्यापुढे | ९७ | ६६५५५० |
| ७ | ब ६ ब ७<br>ब १०<br>ब ११<br>ब १२ | शासन अर्थसहाय्य प्रक्रिया संस्था/ औदयोगीक संस्था,वसाहती/सर्व सहकारी रुग्णालये, शैक्षणिक संस्था/दुध संस्था /अ वर्गात न मोडणारे जिल्हा तालुका महासंघ | १ ते १० | २८८० | २८८०० |
| | | | ११ ते २५ | १२०७ | ४६९०५ |
| | | | २६ ते ५० | ६५० | ६३१५५ |
| | | | ५१ ते १०० | ३७१ | ८१७०५ |
| | | | १०१ ते २०० | २३१ | १०४८०५ |
| | | | २०१ ते ३०० | १८५ | १२३३०५ |
| | | | ३०१ ते ४०० | १६२ | १३९५०५ |
| | | | ४०१ ते ५०० व त्यापुढे | १४८ | १५४३०५ |
| | | **क वर्ग संस्था** | | | |
| १ | क १ | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था | १ ते ५० | २०३ | १०१५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ५१ ते १०० | १४० | १७१५० |
| | | | १०१ ते ३०० | ९९ | ३६९५० |
| | | | ३०१ ते ५०० | ९० | ५४९५० |
| | | | ५०१ ते १००० | ८४ | ९६९५० |
| | | | १००१ ते २००० | ८१ | १७७९५० |
| | | | २००१ ते ३००० व त्यापुढे | ८० | २५७९५० |
| २ | क २ | नागरी पतसंस्था (एका जिल्हयापेक्षा कमी कार्यक्षेत्र) | १ ते १०० | २११ | २११०० |
| | | | १०१ ते २५० | १३४ | ४१२०० |
| | | | २५१ ते ५०० | १०९ | ६८४५० |
| | | | ५०१ ते १००० | ९६ | ११६४५० |
| | | | १००१ ते ५००० | ८६ | ४६०४५० |
| | | | ५००१ ते १५००० व त्यापुढे | ८५ | १३१०४५० |
| ३ | क ३ क ५ क ६ क ७ क ९ क ११ क १२ | पगारदार पतसंस्था (१ कोटीपेक्षा कमी भागभांडवल)/प्राथमिक ग्राहक संस्था/प्रा. दुग्ध संस्था/सर्व सहकारी मंडळे/प्रा. पणन संस्था/इतर शेती संस्था / उपसा जलसिंचन | १ ते ५० | ३३९ | १६९५० |
| | | | ५१ ते १०० | २११ | २७५०० |
| | | | १०१ ते २०० | १४७ | ४२२०० |
| | | | २०१ ते ३०० | १२६ | ५४८०० |
| | | | ३०१ ते ४०० | ११५ | ६६३०० |
| | | | ४०१ ते ५०० | १०९ | ७७२०० |
| | | | ५०१ ते १००० व त्यापुढे | १०४ | १२९२०० |
| ४ | क ४ | गृहनिर्माण संस्था | २५१ | १३४ | ३३६३४ |
| | | | २५२ ते ४०० | ११५ | ५०७६९ |
| | | | ४०१ ते ६०० | १०४ | ७१५६९ |
| | | | ६०१ ते ८०० | ९९ | ९१३६९ |
| | | | ८०१ ते १००० | ९६ | ११०५६९ |
| | | | १००१ ते १५०० व त्यापुढे | ९२ | १५६५६९ |
| ड वर्ग संस्था | | | | | |
| १ | | सर्व संस्था | १ ते ५० | | ४००० |
| | | | ५१ ते १०० | | ५००० |
| | | | १०१ ते २०० | | ७५०० |
| | | | २०१ व त्यापुढील | | १०००० |

## ब. प्राधिकरण स्तरावरील अंदाजीत निधी :-

| अ.क्र. | संस्था वर्ग | संस्थेचे नाव | निवडणूक निधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अ वर्ग | राज्यस्तरीय शिखर किंवा संघीय सहकारी संस्था | २५००० |
| २ | | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक | २५००० |
| ३ | | महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक | २५००० |
| ४ | | महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ | २५००० |
| ५ | | महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ | २५००० |
| ६ | | महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महामंडळ | २५००० |
| ७ | | सर्व सहकारी साखर कारखाने | २५००० |
| ८ | | सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | २५००० |
| ९ | | सर्व सहकारी सूतगिरण्या | १५००० |
| १० | | मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी एक लाख लिटर किंवा एक लाख लिटर पेक्षा जास्त दूध संकलन असणारे सर्व दूध महासंघ किंवा संघ | १५००० |
| ११ | ब वर्ग | सर्व नागरी बँका | २०००० |
| १२ | | सर्व पगारदारांच्या सहकारी बँका | २०००० |
| १३ | | रु.१० लाख व त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असणाऱ्या सर्व प्राथमिक कृषि पतसंस्था आणि आदिवासी सहकारी कृषि पतसंस्था | १००० |
| १४ | | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापेक्षा जास्त आहे. | १०००० |
| १५ | | लगतपूर्वीच्या वर्षाच्या दिनांक ३१ मार्च रोजी रु.१ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त वसूल भागभांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था | १०००० |
| १६ | | साखर कारखाने वगळता शासकीय अर्थसहाय्य मिळालेल्या इतर सर्व सहकारी प्रक्रिया संस्था | ५००० |
| १७ | | शासकीय अर्थसहाय्य मिळालेल्या सहकारी औद्योगीक संस्था व सहकारी औद्योगीक वसाहती | ३००० |
| १८ | | सर्व जिल्हा किंवा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ | १००० |
| १९ | | सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था | ३००० |
| २० | | सर्व सहकारी रुग्णालये आणि सहकारी शैक्षणिक संस्था | ५००० |
| २१ | | मागील आर्थिक वर्षात दररोज सरासरी १,००,००० लिटरपेक्षा कमी दूध संकलन असणारे दूध संघ | ५००० |
| २२ | | अ वर्ग प्रकारात न मोडणारे इतर कोणतेही जिल्हा सहकारी महासंघ किंवा संघ | ३००० |
| २३ | | अ वर्ग प्रकारात न मोडणारे इतर कोणतेही तालूका सहकारी महासंघ किंवा संघ | १००० |
| २४ | क वर्ग | रु.१० लाख व त्यापेक्षा कमी वसूल भागभांडवल असणाऱ्या सर्व प्राथमिक कृषि पतसंस्था आणि आदिवासी सहकारी कृषि पतसंस्था | १००० |
| २५ | | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापूरते आहे. | ३००० |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक ३१ मार्च रोजी रु.१०० लाखापेक्षा कमी वसूल भागभांडवल असलेल्या पगारदारांच्या सहकारी पतसंस्था | ३००० |
| २७ | | लगतच्या मागील वर्षी दिनांक ३१ मार्च रोजी २५१ किंवा जास्त सभासद असलेल्या गृहनिर्माण संस्था | ५००० |
| २८ | | सर्व प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था | १००० |
| २९ | | सर्व प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था ज्यांचे दैनिक दूध संकलन लगतच्या आर्थिक वर्षात १०० लिटर किंवा १०० लिटरपेक्षा जास्त आहे. | ५०० |
| ३० | | सर्व विभागीय आणि जिल्हा सहकारी मंडळे | ५०० |
| ३१ | | सर्व प्रकारच्या प्राथमिक सहकारी पणन संस्था | ५०० |
| ३२ | | इतर कृषि सहकारी संस्था | ५०० |
| ३३ | | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक ३१ मार्च रोजी २०० पेक्षा जास्त सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि पाणी वापर संस्था | १००० |
| ३४ | ड वर्ग | लगतच्या मागील वर्षाच्या दिनांक ३१ मार्च रोजी २०० पेक्षा कमी सभासद असलेल्या सहकारी उपसा जलसिंचन आणि पाणी वापर संस्था | ५०० |
| ३५ | | सर्व मजूर वन कामगार संस्था | ५०० |
| ३६ | | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी औद्योगीक संस्था | ५०० |
| ३७ | | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी प्रक्रिया संस्था, साखर कारखाने वगळून | ५०० |
| ३८ | | सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग व यंत्रमाग) सहकारी संस्था | ५०० |
| ३९ | | सर्व प्राथमिक दुग्ध संस्था ज्यांचे मागील आर्थिक वर्षात दैनिक दूध संकलन १०० लिटर किंवा १०० लिटरपेक्षा कमी आहे. | ५०० |
| ४० | | सर्व प्राथमिक कुक्कूट, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था | ५०० |
| ४१ | | स्वयं व्यवसाय सहकारी संस्था, बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था आणि ज्या सहकारी संस्थांची नोंद सर्वसामान्य संस्था केली आहे | ५०० |

१. सहकारी संस्थेने उपरोक्त प्रमाणे निर्धारित केलेला 'अ' व 'ब' प्रकारचा अंदाजीत निवडणूक निधी पाच वर्षाच्या कालावधीत दरवर्षी २०% च्या प्रमाणात तरतुद करुन सदरचा निधी स्वतंत्र खात्यात गुंतवणूक करावा. सदर संस्थांनी अंदाजीत निवडणूक निधीची संपूर्ण रक्कम एकाच वेळी जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे मुदत संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर एकरकमी जमा करणे अनिवार्य राहील.

२. संस्थेने प्रत्येक आर्थिक वर्षात तरतुद करुन गुंतवणूक केलेला 'अ' व 'ब' प्रकारचा संपूर्ण एकत्रित निवडणूक निधी प्रारुप मतदार यादी सादर करताना जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्याकडे रेखांकीत धनादेशाने किंवा डी.डी. व्दारे जमा करवा. संस्थेने परस्पर बँकेत निधी जमा करु नये.

३. संस्थेने प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये अंदाजीत निवडणूक निधीची स्वतंत्र खात्यामध्ये गुंतवणूक केले बाबतचे विवरणपत्र जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर केल्यावर त्याबाबत स्वतंत्र नोंदवहीत नोंद घेणे अनिवार्य आहे.

४. सहकारी संस्थेने प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये निवडणूक निधी स्वतंत्र बँक खात्यामध्ये न गुंतविल्यास किंवा अनामत जमा निवडणूक निधी निवडणूकी व्यतिरिक्त अन्य कारणाकरीता वापरल्यास त्याची जबाबदारी संचालक मंडळावर राहील.

५. जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी 'ब' प्रकारचा निवडणूक निधी 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी' (बँकेचे नाव स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पुणे मुख्य, **खाते क्रमांक ३४९४४७०३३३८, IFSC Code – SBIN०००४५४**) या बँक खात्यावर त्यांच्या कार्यालयास निवडणूक निधी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून **१५ दिवसांच्या आत जमा करणे** अनिवार्य राहील.

६. अंदाजीत किमान निवडणूक निधी किंवा अंदाजीत कमाल निवडणूक निधी यापैकी जे कमी असेल तो निधी संस्थेने जमा करणे आवश्यक आहे. अंदाजीत निवडणूक निधीची गणना करताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात.

**अ.** वरील अनुसूचीमध्ये संस्थेच्या प्रकारानुसार स्तंभ क्रमांक ४ मध्ये मतदार संख्येचे टप्पे करण्यात आले आहेत. अनुसूचीतील स्तंभ क्रमांक ६ मधील अंदाजीत कमाल निवडणूक निधी निर्धारित करताना स्तंभ क्रमांक ४ मधील मतदार संख्येच्या त्या-त्या टप्प्यातील कमाल मतदार संख्या व त्यापुढील स्तंभ क्रमांक ५ मधील नमूद प्रती मतदार दर यांचा गुणाकार करण्यात आला आहे.

**आ.** जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी स्तरावरील अंदाजीत निवडणूक निधीची परिगणना करताना खालील उदाहरण विचारात घेण्यात यावे.

**उदा. १.**अनुसूचीतील अ.क्र.१ मधील, संस्था प्रकार अ १ ते अ १० मधील जर एखाद्या संस्थेची **मतदार संख्या १००** असेल तर खालील प्रमाणे अंदाजीत निवडणूक निधीची गणना करण्यात यावी.

| अ.क्र. | मतदार संख्या टप्पा | टप्प्यामधील मतदार संख्या | प्रति मतदार दर (रुपये) | अंदाजीत कमाल निवडणूक निधी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते ५० | ५० | २३०९ | ११५४५० |
| २ | ५१ ते १०० | ५० | १२१९ | ६०९५० |
| | **एकूण** | **१००** | | **१७६४००** |

**२.**जर एखाद्या संस्थेची **मतदार संख्या** ८० असेल तर खालील प्रमाणे अंदाजीत निवडणूक निधीची गणना करण्यात यावी.

| अ.क्र. | मतदार संख्या टप्पा | टप्प्यामधील मतदार संख्या | प्रति मतदार दर (रुपये) | अंदाजीत कमाल निवडणूक निधी (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | १ ते ५० | ५० | २३०९ | ११५४५० |
| २ | ५१ ते १०० | ३० | १२१९ | ३६५७० |
| | **एकूण** | ८० | | **१५२०२०** |

७. मयत सभासदांना मतदानाचे अधिकार नसल्यामुळे अशी सभासद संख्या अंदाजीत निवडणूक निधीची आकारणी करताना विचारात घेऊ नये.

८. संस्थेची निवडणूक बिनविरोध झाल्यास अंदाजीत निवडणूक निधी मधून झालेला निवडणूक खर्च वजा जाता शिल्लक निवडणूक निधी १५ दिवसांमध्ये संबंधित संस्थेस परत करावा.

९. संस्थेची निवडणूक झाल्यास निवडणूक निधीमधून झालेला निवडणूक खर्च वजा जाता शिल्लक निवडणूक निधी, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सादर केलेल्या खर्चास राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण अथवा जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांची मंजूरी घेऊन जास्तीत जास्त २ महिन्यामध्ये संबंधित संस्थेस परत करावा.

१०. सदरचे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून ज्या सहकारी संस्थां **प्रारुप मतदार याद्या जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करतील** अशा सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी लागू राहतील.

सदरचे आदेश जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त संस्थांच्या निदर्शनास आणून सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सत्यमेव जयते महाराष्ट्र राज्य, पुणे.

(वसंत पाटील)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव रवाना :-**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. मा. आयुक्त, वस्त्रोदयोग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.